# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

**पानचक्की, औरंगाबाद-४३१००२**

Tele-fax: ०२४०-२४०१५८४, २४०२३६६

Website: www.mahawakf.com, Email: ceomsbw@gmail.com

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ


क्रमांक. मरावमं/एसएनटी-२३८/ 4464/ २०२०　　　　दिनांक.. 5 DEC 2020

प्रति,
**मॅनेजींग ट्रस्टी,**
रोगे चॅरिटीज नं.१ ट्रस्ट,
मरहुम नाखुदा मोहम्मद अली रोगे ॲण्ड
मरहुम नाखुदा मोहम्मद हुसैन रोगेस चॅरीटेबल ट्रस्ट,
१२३, बापु खोटे स्ट्रीट, जामली मोहल्ल,
मुंबई-४००००३

विषय : रोगे चॅरिटीज नं.१ ट्रस्ट, मुंबई च्या संबंधित असलेली वक्फ मिळकत सर्वे नं. १/२१९३ चा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन सोबत करार करण्यास परवानगी मिळणे बाबत.

संदर्भ : १) सिव्हील रिव्हीजन ॲप्लीकेशन क्र. २३१/२०१५ मध्ये इंडियन ऑईल आणि रोगे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त श्री. अब्दुल अजीज मुल्ला आणि इतर यांच्यामध्ये दि. ७/५/२०१७ रोजी झालेली कन्सेंट डिक्री

२) आपला अर्ज दि. ०३/०५/२०१८

३) प्रादेशिक वक्फ अधिकारी मुंबई यांचे पत्र क्र. १०६/२०१८ अहवाल दि. ५/१०/२०१८

४) वक्फ मंडळाची बैठक दि. ४/०२/२०१९ मधील विषय क्र. ३२ ठराव क्र. ३२

५) वक्फ मंडळाची बैठक दि. १३ व २० फेब्रुवारी २०२० विषय क्र. २ ठराव क्र. २

६) या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-१२२/३०२४/२०२० दि. २३/१०/२०२०

७) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : वक्फ.२०१९/प्र.क्र.११७/का-४ दि.११/११/२०२०

रोगे चॅरिटी ट्रस्ट, नं. १ मुंबई नोंदणी क्र. MSBW/MUM/३९९/१८ च्या संबंधित भुलेश्वर डिव्हीजन, रुपावाडी ठाकुरद्वार रोड मुंबई येथील मिळकत सर्वे नं. १/२१९३ क्षेत्र २९२.२१ चौ.मि. जागा सन १९३४ पासुन इंडो बर्मा पेट्रोलियम कंपनी बरोबर परस्परातील अटी व शर्तीस अनुसरुन करार करण्यांत आला होता. त्यानंतर सदर भाडेकराराचे सन १९३९ मध्ये ५ वर्षासाठी, सन १९४४ मध्ये १० वर्षासाठी, सन १९५४ मध्ये १० वर्षासाठी, सन १९६४ मध्ये १० वर्षासाठी, १०७५ मध्ये ५ वर्षासाठी नुतनीकरण करण्यात आलेले आहे. सन १९७८-१९८३ या काळात रुपये ८००/- आणि दि. १/१२/१९८३ ते ३०/११/१९८८ या काळात रुपये १७५०/- भाडे देण्याचे ठरले होते.

त्यानंतर दि. १/१२/१९८८ ते दि. ३०/११/१९९३ मध्ये भाडेकराराची मुदत संपल्यानंतर भाडे वाढवून न दिल्यामुळे रोगे ट्रस्ट आणि इंडियन आईल यांनी लघुवाद न्यायालयात (Small Causes Court) दावा दाखल केला होता सदर दाव्यातील निकाल इंडियन ऑईल यांच्या विरोधात गेल्याने इंडियन ऑईल कंपनीने मा. मुंबई उच्च न्यायालयात सिव्हील रिव्हीजन ॲप्लीकेशन क्र. २३१/२०१५ दाखल केले होते. सिव्हील रिव्हीजन ॲप्लीकेशन क्र. २३१/२०१५ मध्ये इंडियन ऑईल कंपनी आणि श्री. अब्दुल अजीज मुल्ला आणि इतर यांच्या मध्ये consent decree झाल्याने मा. उच्च न्यायालयाने दि. ७/४/२०१७ च्या आदेशान्वये सदर याचिका Consent decree नुसार निकाली काढली आहे.

सदर मिळकत वक्फ असल्याने संबंधीत कंपनी सोबत १५ वर्षाचे करार करण्यासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस वक्फ संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री. अब्दुल अजीज मुल्ला यांनी दि. ३/५/२०१८ रोजी विनंती केल्यावरुन प्रादेशिक वक्फ अधिकारी, मुंबई यांना संदर्भीय अहवाल सादर केला होता.

वक्फ लिझ रुल्स-२०१४ मध्ये सन २०१५ व २०२० मध्ये करण्यांत आलेल्या सुधारीत नियम क्र. १८ (२) मधील तरतुदीनुसार १९९५ पासुन ताब्यात असलेल्या भाडेपट्टा धारकाच्या बाबतीत निविदा प्रक्रिया न राबविता १० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्या विषयी मा. उच्च न्यायालयाचे आदेश असल्याने त्या प्रमाणे १५ वर्षासाठी भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्याचा प्रस्ताव वक्फ मंडळच्या दि. ०४/०२/२०१९ च्या बैठकीत ठेवण्यात आला होता त्यामध्ये सदर संस्थेच्या संबंधीत असलेली वक्फ मिळकत सर्वे नं. १/२१९३ क्षेत्र २९२.२१ चौ. मि. दिर्घ मुदतीच्या भाडे पटट्यावर १५ वर्षा करिता केंद्रिय शासन अधिसुचना वक्फ मालमत्ता भोडपट्टा लिझ रुल्स-२०१४ (सुधारणा २०१५) मधील तरतुदीनुसार दर आकारुन मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे रितसर प्रस्ताव सादर करणे बाबत ठराव क्र. ३२ अन्वये मान्यता देण्यात आली व त्यास दि.१३ व २० फेब्रुवारी २०२० रोजीच्या वक्फ मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. २ अन्वये कायम करण्यात आले.

वक्फ मंडळाच्या ठरावानुसार संदर्भीय पत्र क्र. ६, अन्वये सदर प्रस्ताव शासनाच्या पुर्व मंजुरीसाठी शासनाकडे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.

वर नमुद प्रकरणांत इंडियन ऑईल कंपनी आणि रोगे चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यामध्ये दि. ३१/१२/२०२९ पर्यंत भाडेकरार करण्यास खालील अटींच्या अधिन राहून अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : वक्फ.२०१९/प्र.क्र.११७/का-४ दि.११/११/२०२० अन्वये शासनाने मान्यता दिलेली आहे.

## आदेश :-

The Wakf Properties Lease Rules-२०१४ (सुधारणा २०२०) च्या नियम १८(२) मधील परंतुकानुसार इंडियन ऑईल कंपनी आणि रोगे चॅरिटेल ट्रस्ट यांच्या सोबत भाडेकरार करतांना एका वेळी देण्यात येणारे सवलत (As measure of one time consession) आणि मा. उच्च न्यायालयाने सिव्हील

रिव्हीजन अप्लीकेशन क्र. २३१/२०१५ मध्ये दिलेले आदेश पाहता, इंडियत ऑईल कंपनी ने सन २०१५ ते २०२० या कालावधीतील थकीत भाडे (वार्षीक वाढीव ५% दराने) रोगे चॅरिटेबल ट्रस्टना देण्याच्या अटीवर राहून इंडियन ऑईल कंपनी आणि रोगे चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यामध्ये दि. ३१/१२/२०२९ पर्यंत खालील अटींच्या अधिन राहून भाडेकराराचे नुतनीकरण करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर भाडेकरार करतांना The Wakf Properties Lease Rules-२०१४ (सुधारणा २०१५ व २०२०) मधील नियम क्र. ७, ८, ९, १०, ११, १२, १७ आणि १८ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.
२. The Wakf Properties Lease Rules-२०१४ (सुधारणा २०१५ व २०२०) मधील नियम क्र. १८ मधील परंतुकानुसार भाडेधारकाकडून शपथपत्र (Undertaking) घेण्यात यावे.
३. सदर भाडेकराराची अंमलबजावणी करतांना वक्फ अधिनियम १९९५, The Wakf Properties Lease Rules-२०१४ (सुधारणा २०१५ व २०२०) आणि महाराष्ट्र वक्फ नियम, २००३ संबंधित तरतुदीनुसार यथोचित कार्यवाही करावी.
४. उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा पुर्ती अहवाल भाडेकराराची अंमलबजावणी (Execution) झाल्यानंतर १५ दिवसांत या कार्यालयास सादर करावा.
५. वरील नुतनीकरण करण्यात आलेल्या भाडेपट्टयाची १० वर्षाची मुदत संपल्यानंतर भाडेपट्टा कराराचे पुन्हा नुतनीकरण करण्यात येणार नाही व तद्नंतर भाडेपट्टा करावयाचा झाल्यास वक्फ लिज रुल्स मधील तरतुदीनुसार नव्याने निविदा प्रक्रिया राबवून त्याप्रमाणे भाडेपट्टा करार करण्यात येईल.
६. वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम (सुधारीत २०२०) मधील नियम क्र. ८ (१) व (२) नुसार भाडेपट्टाधारकाने कराराच्या दिनांकास त्यास रेडी रेकनर नुसार आकारण्यात येणा-या मासिक भाडयाची ६ महिने कालावधीची रक्कम, अनामत रक्कम म्हणुन महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे तात्काळ जमा करावी.
७. वर नमुद १० वर्षाच्या भाडेपट्टा नुतनीकरणाची मुदत समाप्ती दि. ३१/१२/२०२९ रोजी भाडेपट्टाधारकाने मालमत्तेचा ताबा शांततापुर्ण व विना विलंब वक्फ संस्थेस द्यावा लागेल.

रोगे चॅरिटीज नं. १ ट्रस्ट, मुंबई यांनी वर नमुद अटी व शर्तीनुसार इंडियन ऑईल कंपनी सोबत दि. ३१/१२/२०२९ पर्यंत च्या कालावधीसाठी भाडेकरार करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल करारपत्रासह व शपथपत्रासह या कार्यालयास सादर करावा.

05/12/2020

**( अनिस शेख )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
औरंगाबाद

सोबत : शासन निर्णय व भाडेपट्टा नियम २०१४ (सुधारणा २०१५ व २०२०) ची प्रत

प्रत,
मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -३२ यांना महितीस्तव सादर.